# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर


## ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१

Tel.-22665233 Fax.-22661239 Email-rdcmumbaicity@gmail.com


क्रमांक :- रवका/टे-३/एमपीआयडी केस क्र.१६/१४@२७/१४/जाहीर लिलाव/२०१८

दिनांक :- 23 FEB 2018

## जाहीर लिलाव नोटीस

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे अधिनियम १९९९ (MPID- १९९९) अंतर्गत कार्यवाही केलेली असुन एमपीआयडी केस क्र. १६/१४ @ २७/१४ मध्ये श्री. सुहास सज्जन रावराणे आणि इतर यांच्या जागा, जमिनी अशा एकुण ४ मिळकती / मालमत्ता आर्थिक गुन्हे शाखा बृहन्मुंबई यांचेकडून जप्त केलेले आहेत. तसेच शासन, गृह विभाग, अधिसूचना क्र.एमपीआय-२०१६/प्र.क्र.१२८/पोल-११, दि.२३.११.२०१६ अन्वये सदर मालमत्ता/मिळकती अधिसूचित झालेल्या आहेत.

मा. विशेष न्यायाधिश, शहर दिवाणी व विशेष सत्र न्यायालय, स्पेशल कोर्ट क्र.३६, बृहन्मुंबई यांचेकडे दि.१७.०२.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार जप्त केलेल्या मालमत्ता / मिळकती पैकी खालील नमुद केलेल्या **मालमत्ता / मिळकती जशा आहेत, जेथे आहेत त्यास्थितीत विक्री करण्यासाठी** बोलीद्वारे जाहीर लिलाव करण्याचे निश्चित केले आहे.

ज्या व्यक्ती / संस्था सदर मालमत्ता / मिळकती पैकी एक किंवा अधिक मालमत्ता / मिळकती खरेदीसाठी इच्छुक असतील त्यांनी स्वतंत्र अर्ज करुन सदर अर्जामध्ये प्रत्येक मालमत्ता / मिळकतीच्या अपसेट प्राईसच्या **१०% रकमेचा** धनाकर्ष (डी.डी.) **"RDC Mumbai City & Competent Authority MPID"** या नावाने **जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत कार्यालयीन वेळेत** अर्जासह कार्यालयाकडे जमा करावा.

**पुणे जिल्हयातील जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशिल :**

| अ. क्र. | मिळकतीचे वर्णन | गट नं. / स. नं. | क्षेत्र | मालमत्ता किंमत (Property Price) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे मारणेवाडी, ता. मुळशी, जि. पुणे | गट क्र.३३८ पैकी | क्षेत्र १ हेक्टर २१ आर | रु.३७,५०,०००/- |
| २ | मौजे मारणेवाडी, ता. मुळशी, जि. पुणे | गट क्र.३९४ पैकी | क्षेत्र ४८ आर | रु.१५,००,०००/- |
| ३ | मौजे मारणेवाडी, ता. मुळशी, जि. पुणे | गट क्र.३३७ पैकी | क्षेत्र १ हेक्टर १८ आर | रु.५२,५०,०००/- |

**सदर मालमत्ता संबंधिची विस्तृत माहिती, अर्जाचा नमुना व लिलावाच्या अटी व शर्ती या कार्यालयाचे संकेतस्थळ www.collectormumbaicity.gov.in वर प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत.**

## -: लिलावाच्या अटी व शर्ती :-

१) जाहीरातीमध्ये नमुद अ. क्र. १ ते ३ या मालमत्तेची न्युनतम किंमत (Upset Price) मा. न्यायालयाने दि.०१.०३.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार **सन २०१५** च्या बाजारभावाच्या मुल्यांकनामध्ये **२५% रक्कम कमी** करुन ठरविण्यात आलेली आहे. जाहीर लिलावात भाग

घेणाऱ्या बोलीदारास मालमत्तानिहाय न्युनतम किंमतीच्या (Upset Price) च्या १०% रक्कम जाहीर लिलावात भाग घेण्यापूर्वी सक्षम प्राधिकारी यांचेकडे **"RDC Mumbai City & Competent Authority MPID"** या नावे धनाकर्षा (डी. डी.) द्वारे **"अनामत"** रक्कम म्हणून धनाकर्षाने जमा करावी लागेल.

२) मा. न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे उच्चतम बोली लावणाऱ्यास जाहीर लिलाव देण्यात येईल.

३) यशस्वी बोलीदारास मा. न्यायालयाकडून विहित मालमत्ता / मिळकती संबंधी मंजूर झालेली रक्कम अनामत रक्कम वगळून उर्वरित रक्कम **३० दिवसांच्या आत**, **"RDC Mumbai City & Competent Authority MPID"** या नावे धनाकर्षा (डी. डी.) द्वारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल.

४) खरेदी नोंदणीकृत करण्यासाठी लागणारे मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदाराची राहील.

५) उपरोक्त नमुद मालमत्ता/मिळकत लिलाव करताना **"जशी आहे त्यास्थितीत"** करण्यात येईल. मालमत्तेसंबंधी भाडेकरु, अगर इतर हितसंबंधातील व्यक्तीचे हितसंबंध जपणे किंवा मार्गी लावणे ही बाब उच्चतम बोलीदाराने हाताळवयाची आहे. तसेच सदर मिळकत / मालमत्ता संबंधीची तक्रार इत्यादी व थकबाकींचे निरसन करणेची सर्वस्वी जबाबदारी उच्चतम बोलीदाराची असेल.

६) जर यशस्वी बोलीदाराने संपूर्ण रक्कम विहीत मुदतीत न भरल्यास यशस्वी बोलीदाराने भरलेली **अनामत रक्कम जप्त** करण्यात येईल व तद्नंतर व्दितीय क्रमांकाचे उच्चतम बोलीदारास जाहीर लिलाव देण्यास प्राधान्य देण्यात येईल.

७) वरील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करणेचे व अतिरिक्त अटी व शर्ती ठरविणेचे सर्व हक्क सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

८) **संपर्कासाठी खालील क्रमांक :**

कार्यालय दूरध्वनी क्रमांक **-०२२ - २२६६ ५२३३ (विस्तारित क्र. १२२)**

श्री. प्रकाश कुटे (अव्वल कारकुन, आस्थापना शाखा)- **८६ ९२९४ ६९६९**

(चंद्रकांत थोरात)
निवासी उपजिल्हाधिकारी
तथा सक्षम प्राधिकारी
मुंबई शहर

ठिकाण : मुंबई शहर
दिनांक : 23 FEB 2018

**मा. विशेष न्यायाधिश, शहर दिवाणी व विशेष सत्र न्यायालय, स्पेशल कोर्ट क्र.३६, बृहन्मुंबई यांचेकडील एमपीआयडी केस क्र. १६/१४ @ २७/१४ मध्ये जप्त मालमत्ता/ मिळकत जाहीर लिलावाव्दारे खरेदी करणेकरिता अर्जाचा नमुना**

प्रति,

सक्षम प्राधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर,
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,
जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई-४०० ००१

कृपया पासपोर्ट साईज फोटो चिकटविणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदारांचे पुर्ण नांव | | |
| २ | अर्जदारांचा पुर्ण पत्ता | | |
| ३ | टेलिफोन/मोबाईल नंबर | | |
| ४ | अर्जदाराचा सध्याचा व्यवसाय | | |
| ५ | धनाकर्ष क्रमांक व दिनांक | | |
| ६ | पॅन कार्ड नंबर | | |
| ७ | ई-मेल ॲड्रेस | | |
| ८ | अनामत रक्कम परत करणेकरिता बँकेची पुर्ण माहिती | | |
| ९ | जाहीरातीत नमुद अ.क्र.१, २ व ३ मालमत्ता/मिळकती पैकी खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या मिळकती | गट क्र. | क्षेत्र |
| | | | |
| | | | |
| | | | |

आपणामार्फत दैनिक ----------------- मध्ये दिनांक -------------- रोजी प्रसिध्द करणेत आलेली जाहीरात मी वाचली असुन मी सदर मिळकत खरेदी करण्यास इच्छुक आहे. जाहिरातीत दिलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच १०% प्रमाणे येणारी अनामत रक्कम रु.----------------/- (जाहीरातीत नमुद मिळकतीच्या मुल्यांकनाच्या १०% प्रमाणे येणारी रक्कम) डी. डी. सोबत जोडला आहे.

आपला विश्वासु,

स्थळ :-

दिनांक :-